# | श्री गणपति अथर्वशीर्ष |

गणपती ही देवता सर्वसामान्य मराठी जनांची विशेष प्रेमाची व श्रद्धेची असल्याने अथर्वशीर्षही अत्यंत लोकप्रिय आहे. अथर्वशीर्ष ऐकले नाही अशी व्यक्ती महाराष्ट्रात मिळणे दुरापास्तच ! या स्तोत्राला श्रीगणपति अथर्वशीर्षोपनिषत् किंवा गणपति उपनिषत् असेही नाव आहे. स्तोत्राच्या शेवटच्या ओळीत म्हटल्याप्रमाणे ते अथर्ववेदाशी संलग्न आहे.

ॐ नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि त्वमेव केवलं कर्ताऽसि त्वमेव केवलं धर्ताऽसि त्वमेव केवलं हर्ताऽसि त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि त्व साक्षादात्माऽसि नित्यम् ।।१।।

मराठी- ॐ । तुला - गणांच्या प्रमुखाला नमस्कार असो. तूच खरोखरीचे आदितत्त्व आहेस. (या जगाचा) केवळ तूच कर्ता करविता आहेस. (हे सारे जग) केवळ तूच धारण करतोस. (या जगाचा) नाशही करणारा केवळ तूच आहेस. खरोखर हे पूर्णब्रह्म तूच आहेस. अर्थात् स्पष्ट आत्मतत्त्व ते तूच आहेस. ॥ १

ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ।।२।।

मराठी- मी मनोभावे बोलत आहे. शाश्वत सत्य बोलत आहे. ॥ २

अव त्वं माम्। अव वक्तारम्। अव श्रोतारम्। अव दातारम् । अव धातारम्। अवानूचानमव शिष्यम्। अव पश्चातात्। अव पुरस्तात्। अवोत्तरात्तात्। अव दक्षिणात्तात्। अवचोर्ध्वात्तात्।। अवाधरात्तात्।। सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ।। ३।।

मराठी- तू माझे रक्षण कर. तू बोलणाऱ्याचे (हे स्तोत्र पठण करणाऱ्याचे) रक्षण कर. (हे स्तोत्र) ऐकणाऱ्याचे रक्षण कर. (शिष्याला विद्येचे) दान देणाऱ्याचे रक्षण कर. (ती विद्या) धारण करणाऱ्याचे रक्षण कर. गुरूचे रक्षण कर. शिष्याचे रक्षण कर. (आमचे) पाठीमागून रक्षण कर. समोरून रक्षण कर. डावीकडून रक्षण कर. उजवीकडून रक्षण कर. (आमचे पूर्व,पश्चिम,दक्षिण, उत्तरेकडून रक्षण कर). वरच्या बाजूने रक्षण कर. खालील बाजूने रक्षण कर. सर्व बाजूंनी माझे रक्षण कर, रक्षण कर. ॥ ३

त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मय:। त्वमानंदमसयस्त्वं ब्रह्ममय:। त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि। त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।।४।।

मराठी- तू वाणीस्वरूप आहेस. तू ज्ञानस्वरूप आहेस. तू आनंदस्वरूप आहेस. तू ब्रह्मस्वरूप आहेस. तू सत्यज्ञान व आनंदयुक्त परमेश्वररूप आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोणीही नाही. तू प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप आहेस. सर्व भौतिक आणि पारलौकिक ज्ञान तुझ्यात सामावलेले आहे. ॥ ४

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते। सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति। सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति। त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभ:। त्वं चत्वारि वाक्पपदानि ।।५।।

मराठी- हे सर्व विश्व तुझ्यापासून निर्माण होते. हे सर्व जग तुझ्यामुळे स्थिरावले आहे. हे सर्व जग तुझ्याकडे परत येऊन तुझ्यात विलीन होणार आहे. तू पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश (आहेस). तू वाणीची चार रूपे (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी) (आहेस). ‖ ५

त्वं गुणत्रयातीत: त्वमवस्थात्रयातीत:। त्वं देहत्रयातीत:। त्वं कालत्रयातीत:। त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यं। त्वं शक्तित्रयात्मक:। त्वां योगिनो ध्यायंति नित्यं। त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रूद्रस्त्वमिद्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव:स्वरोम् ‖ ६

मराठी- तू (सत्त्व, रज आणि तम या) तिन्ही गुणांच्या पलिकडे आहेस. तू (जागृती,स्वप्न आणि सुषुप्ती या) तीन अवस्थांपलिकडे आहेस. तू (स्थूल,सूक्ष्म आणि कारण या) तीनही देहां पलिकडे आहेस. तू (भूत,वर्तमान आणि भविष्य या) त्रिकालापलिकडे आहेस. (मानवी शरीरातील) मूलाधार चक्रात तुझा नेहेमी निवास असतो. (इच्छा,ज्ञान आणि क्रिया या) तिन्ही शक्ती तुझ्यात एकवटल्या आहेत. योगीजन नेहेमी तुझे ध्यान करतात. ब्रह्मा,विष्णू,रुद्र,इंद्र,अग्नी,हवा,सूर्य,चंद्र हे सर्व तूच आहेस. ब्रह्मा; भू, भुव, स्वः हे त्रिलोक; आणि प्रणव तूच आहेस. ‖ ६

गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरम्। अनुस्वार: परतर:। अर्धेन्दुलसितं। तारेण ऋद्धम् । एतत्तव मनुस्वरूपं। गकार: पूर्वरूपं। अकारो मध्यमरूपं। अनुस्वारश्चान्त्यरूपं। बिन्दुरूत्तररूपं। नाद: संधानं। संहितासंधि: । सैषा गणेश विद्या। गणकऋषि: । निचृद्गायत्रीच्छंद:। गणपतिर्देवता। ॐ गं गणपतये नम: ।।७।।

मराठी- (गं शब्दाचे) पहिले अक्षर ‘ग्’ अगोदर उच्चारून त्यानंतर वर्णातील पहिला ‘अ’ उच्चारला. त्यावर अनुस्वार दिला. चंद्रकोरीने शोभिवंत दिसणारे हे तुझे एकाक्षरी बीजमंत्राचे स्वरूप आहे. (उच्च स्वरोच्चाराने अधिक प्रकर्षित होणारे तुझे स्वरूप आहे). या मंत्राचे ‘ग’ कार पूर्वरूप, ‘अ’ कार मध्यरूप, अनुस्वार अखेरीचे रूप व (ॐ कारस्वरूप) बिंदु हे उत्तररूप आहे. या (चारहींचे) चे ध्वनीतून होणारे एकत्रीकरण. या सर्वांचे (बीजमन्त्र रूपात) साहचर्य हीच ती गणेशविद्या. (या मंत्राचा रचनाकार) गणक ऋषी, छन्द निच्ऋद्गायत्री व देवता गणपति आहे.
‘ॐ गं गणपतये नम:।’ (हा तो अष्टाक्षरी मन्त्र होय.) ‖ ७

एकदंताय विद्महे। वक्रतुण्डाय धीमहि। तन्नो दंती प्रचोदयात् ।।८।।

मराठी- एक दात असलेल्या गजाननाला आम्ही जाणतो. वाकडी सोंड असणाऱ्या गजाननाचे आम्ही ध्यान करतो. त्या कामी तो गजमुख आम्हांस प्रेरणा देवो. ‖८‖

टीप- या भागास गणेशगायत्री असे म्हणतात. निच्ऋद्गायत्री छंद हा गायनाच्या दृष्टीने थोडाफार गायत्री छंदाचाच प्रकार आहे. गायत्री छंदात (८x३=) २४ अक्षरे वापरली जातात, तर निचृद्गायत्री छंदात २३ अक्षरे असतात.

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम्। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणं मूषकध्वजम्। रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्। रक्तगंधाऽनुलिप्तांगं रक्तपुष्पै: सुपूजितम्।। भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम्। आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृतेः पुरुषात्परम्।
एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वर: ।।९।।

मराठी- " एकच दात असलेला, चार भुजा व त्यांनी (दोराचा) फास, अंकुश, तुटलेला (दुसरा) दात व चौथ्या हाताने आशीर्वाद मुद्रा धारण करणारा, ध्वजावर उंदिराचे चिन्ह असणारा, लाल रंगाचा, मोठे पोट असणारा, सुपासारखे कान असणारा. लाल रंगाचे वस्त्र नेसलेला, शरीरावर लाल रंगाची उटी लावलेला, तांबड्या रंगाच्या फुलांनी ज्याची उत्कृष्ट पूजा बांधली आहे भक्तांवर दया करणारा, सर्व जगाचे कारण असणारा, स्थिर, जो सृष्टीच्या आधीच प्रगट झाला, जो स्त्री आणि पुरुष (निसर्ग आणि प्राणी) यांच्यापेक्षा सर्वश्रेष्ठ देव आहे " असे जो सदा चिंतन करतो तो योगी सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ होय. ॥ ९

टीप- गजाननाला 'एकदन्त' नाव पडण्यामागे परशुरामाबरोबर झालेल्या झटापटीत गणेशाचा एक दात तुटला किंवा व्यासांनी रचलेले महाभारत लिहून घेताना गणेशाने एक दात उपटून त्याची लेखणी बनवली अशा दोन आख्यायिका सांगण्यात येतात.

नमो व्रातपतये। नमो गणपतये। नम: प्रमथपतये। नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय। विघ्ननाशिने शिवसुताय। श्रीवरदमूर्तये नमो नम: ।।१०।।

मराठी- जनसमूहांच्या प्रमुखाला नमस्कार । लोकांच्या तुकडीच्या प्रमुखाला नमस्कार । शिवाच्या भूतगणांच्या प्रमुखाला नमस्कार । मोठे पोट असलेल्या, एकच दात असणाऱ्या, अडचणींचा नाश करणाऱ्या, महेशाच्या पुत्राला, भक्तांना वरदान देणाऱ्या गजाननाला नमस्कार. ॥ १०

फलश्रुति -

एतदथर्वशीर्षं योऽधीते। स ब्रह्मभूयाय कल्पते। स सर्व विघ्नैर्न बाध्यते। स सर्वत: सुखमेधते। स पञ्चमहापापात्प्रमुच्यते।। ११।।

मराठी- जो या अथर्वशीर्षाचे अध्ययन करतो तो ब्रह्मरूप होतो. त्याला कोणत्याच अडथळ्यांची बाधा होत नाही. त्याला सर्वत्र सुख मिळते. तो पांचही महापापांपासून मुक्त होतो. ॥ ११

टीप- मनुस्मृती तसेच श्रीमद् भागवतानुसार  मद्यपान, ब्राह्मणहत्या, चोरी, गुरुस्त्रीगमन आणि विश्वासघात ही पाच महापापे आहेत.

सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति। सायंप्रात: प्रयुंजानोऽपापो भवति। सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति। धर्मार्थकाममोक्षं च विंदति।। १२।।

मराठी- (अथर्वशीर्षाचे) संध्याकाळी पठण करणारा दिवसा झालेल्या पापाचा नाश करतो. सकाळी पठण करणारा रात्री घडलेल्या पापाचा नाश करतो. सकाळ-संध्याकाळ पठण करणारा निष्पाप होतो. सर्व ठिकाणी (त्याचे) अध्ययन करणाऱ्याची सर्व  विघ्ने नष्ट होतात. तो धर्म, अर्थ, काम व मोक्ष मिळवितो. ॥ १२

इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम्। यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति।
सहस्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत्। १३।।

मराठी- हे अथर्वशीर्ष शिष्यत्वाची भावना नसणाऱ्या (अयोग्य) व्यक्तीला (उपदेशस्वरूपात) देऊ नये. जर कोणी ते लालचीने अशा माणसास देईल तर त्याला पाप लागते. हे अथर्वशीर्ष एक हजार वेळा म्हटल्यास जी जी इच्छा तो मनुष्य करील ती ती या योगे फलद्रूप होईल. ॥ १३

अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति चतुर्थ्यामनश्नन् जपति स विद्यावान भवति।
इत्यथर्वणवाक्यं। ब्रह्माद्यावरणं विद्यात् न बिभेति कदाचनेति।। १४।।

मराठी- या अथर्वशीर्षानें जो गणपतीला अभिषेक करतो, तो उत्तम वाक्पटू होतो, कांहीं न खातां जो चतुर्थीच्या दिवशी याचा जप करतो तो विद्यासंपन्न होतो, असे अथर्वण ऋषींचें वाक्य आहे. तो ब्रह्मकोष जाणू शकेल. त्याला कधीच भीती वाटत नाही. ॥ १४

यो दूर्वांकुरैंर्यजति स वैश्रवणोपमो भवति। यो लाजैर्यजति स यशोवान भवति स मेधावान भवति।
यो मोदकसहस्रेण यजति स वाञ्छित फलमवाप्नोति। य: साज्यसमिद्भिर्यजति
स सर्वं लभते स सर्वं लभते।। १५।।

मराठी- जो दुर्वांकुर अर्पण करतो तो कुबेरासम होतो. जो साळीच्या लाह्यांनी हवन करतो, त्याला यश मिळते. तो बुद्धिमान् होतो. जो हजार मोदक  अर्पण करतो, त्याला हवे ते मिळते. जो तूप आणि समिधांनीं यज्ञ करतो त्याला सर्व मिळते, सर्व काही प्राप्त होते. ॥ १५

अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति। सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जप्त्वा
सिद्धमंत्रो भवति। महाविघ्नात्प्रमुच्यते। महादोषात्प्रमुच्यते। महापापात् प्रमुच्यते।

स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति।
य एवं वेद इत्युपनिषद्।। १६।।

मराठी- आठ ब्राम्हणांना (या कार्यासाठी) एकत्र करून, (यजमान) सूर्यासारखा तेजस्वी होतो. सूर्यग्रहण काळात, महानदीच्या काठी किंवा गणपतीच्या मूर्तीसमोर (बसून) जप केल्यास त्याचा मंत्र सिद्ध होतो. मोठ्या अडथळ्यांपासून मोकळा होतो. मोठ्या दोषापासून मुक्त होतो. महापापापांतून सुटतो. तो सर्वज्ञ होतो. तो सर्वज्ञ होतो, असें उपनिषद् सांगते हें तो जाणतो ॥१६

************************